पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/१०/२०१६** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक **१४/१०/२०१६** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा. श्री.दौलत देसाई, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे** व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.गोफणे अनुराधा देविदास
२. मा.सुपे आशा रविंद्र
३. मा.श्रीम.टेकवडे सुजाता अविनाश
४. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
५. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
६. मा.जवळकर वैशाली राहुल

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लावंड – कायदा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( मा.महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडणेसाठी कामाकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली आहे. )

----------

**मा.पीठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे** - सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.महिला बालकल्याण समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केली आहे.

**मा.नगरसचिव -** विषय क्र.१ - मा.महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीची नेमणूक करणे.

मा.महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदासाठी नेमणूक करणेकामी एक नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | **मा.गोफणे अनुराधा देविदास** | **मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर** | **मा.श्रीम.टेकवडे सुजाता अविनाश** |

( मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशन पत्र मा.पीठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्त केले. मा.पीठासीन प्राधिकारी यांनी त्याची छाननी केली )

**मा.पीठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे** - मा.महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. सभापती महिला व बालकल्याण समिती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढील प्रमाणे आहे.

**१) मा.गोफणे अनुराधा देविदास**

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पीठासीन प्राधिकारी यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल. अशी तरतूद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे.

(मा.पीठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दुपारी **१२.०५** ते दुपारी **१२.२०** हा १५ मिनिटांचा अवधी संपला.)

**मा.पीठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे** - उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.गोफणे अनुराधा देविदास** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.गोफणे अनुराधा देविदास** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक ०१ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १४/१०/२०१६ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदासाठी एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले असून वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.गोफणे अनुराधा देविदास** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.गोफणे अनुराधा देविदास** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

सही/-
**( दौलत देसाई )**
**पीठासीन प्राधिकारी तथा**
मुख्य कार्यकारी अधिकारी
महिला व बालकल्याण समिती
(विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

( नवनिर्वाचित सभापती **मा.गोफणे अनुराधा देविदास** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

मा.नगरसचिव - विषय क्र.२ - मा.महिला व बालकल्याण समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

मा.महिला व बालकल्याण समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक - ०२ विषय क्रमांक - ०२
दिनांक - १४/१०/२०१६
सुचक : मा.वैशाली जवळकर अनुमोदक : मा.पौर्णिमा सोनवणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापतीची नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३
दिनांक - १४/१०/२०१६
सुचक : मा.वैशाली जवळकर अनुमोदक : मा.पौर्णिमा सोनवणे

मा.महिला व बालकल्याण समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
**(गोफणे अनुराधा देविदास )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५५८/२०१६
दिनांक : १४/१०/२०१६

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 201६ sub committee sabhapati.doc